# HISTORY BY I.SHRIKANT

# बंगाल - इंग्रज संघर्ष





# मुर्शीदकुली खान (1717-27)

औरंगजेबने 1700 मध्ये बंगालचा

दिवाण म्हणून मुर्शीदकुली खान

याची नेमणूक केली.

मुघल सत्ता कमजोर असण्याच्या काळात त्याची नियुक्ती जशी झाली तसा तो  शासक बनला.

दिल्लीच्या बादशाहला तो फक्त नजराणा पाठवायचा.

फर्रुख सियारने 1717 मध्ये त्याची सुभेदार म्हणून नियुक्ती केली.

- मुर्शीदकुली खान याने आपली राजधानी ढाक्याहून मुर्शिदाबाद येथे नेली. त्याने बंगालच्या प्रशासनात विविध सुधारणा घडवून आणल्या. तो बंगालचा पहिला नवाब बनला.
- मुर्शीदकुली खानने ईस्ट इंडिया कंपनीला जकात न भरण्याची सूट नाकारली होती.
- भू-राजस्व वसुलीसाठी ठेकेदारी पद्धत पद्धत मुर्शीदकुली खान याने सुरू केली.

# शुजाउद्दीन (1727-39)

शुजाउद्दीन हा मुर्शीदकुली खानचा जावई होता.

मुघल बादशाह मुहम्मद शाहने 1733 साली बिहारची सुभेदारी त्याला बहाल केली.

# सरफराझ खान (1739-40)

- तो शुजाचा मुलगा होता. मात्र त्यास बिहारचा नायब सुभेदार अलीवर्दी खान याने एप्रिल 1740 मध्ये 'घेरीयाच्या लढाई'त ठार मारले.



# अलीवर्दी खान (1740-56)

- अलीवर्दी खानने इंग्रजांना कलकत्ता व फ्रेंचांना चंद्रनगरच्या कारखान्यावर तटबंदी बांधण्यास विरोध केला. तसेच त्याने इंग्रज व फ्रेंच व्यापाऱ्यांना विशेष अधिकारांचा गैरवापर करण्यापासून प्रतिबंधदेखील केला होता.

- त्याच्या काळात बंगालमध्ये मराठ्यांचे (नागपूरच्या भोसलेंचे) सतत हल्ले सुरू होते. वर्षाला 12 लाख रुपये चौथाई मान्य करून त्याने भोसलेंशी शांतता प्रस्थापित केली.
- अलीवर्दी खानला तीनही मुली होत्या.
- अलीवर्दी खानच्या छोट्या मुलीचा मुलगा सिराज उद्दौल्ला बंगालचा नवाब बनला.



# सिराज उद्दौल्ला (1756-57)

- सिराज उद्दौल्ला हा अलीवर्दी खानचा नातू होता.
- बंगालच्या नवाबपदी विराजमान

सिराज उद्दौल्लाच्या काळात घडलेली महत्त्वाची घटना म्हणजे प्लासीची लढाई होय. या लढाईमुळे बंगालची सत्ता ब्रिटिशांच्या हातात आली.

भारतीय मालावर ब्रिटिशांनी जबर जकात बसवले.

- शौकतजंग व घसेटी बेगमला मदत न करण्याचे तसेच वखारींच्या तटबंदी पाडण्याचे आदेश नवाबाने ब्रिटिशांना दिले, पण ब्रिटिशांनी ते पाळले नाहीत, त्याकडे दुर्लक्ष केले.
- आपल्या आदेशांकडे होत असलेले दुर्लक्ष पाहून सिराजने प्रथम 4 जून 1756 रोजी इंग्रजांच्या कासीम बाझार या वखारीवर हल्ला करून ती ताब्यात घेतली.



- **अंधारकोठडी दुर्घटना** - 20 जून 1756 रोजी एका 18 बाय 14 फुटाच्या छोट्या खोलीत नवाबाने पकडलेले 146 इंग्रज युद्धकैदी म्हणून ठेवण्यात आले होते. खोलीत उष्णता व प्राणवायू नसल्याने 123 कैद्यांचा मृत्यू झाला. केवळ 23 जणच जिवंत राहिले. या घटनेला अंधारकोठडी दुर्घटना ('ब्लॅक होल ट्रॅजेडी') असे नाव पडले.



# प्लासीची लढाई (23 जून 1757)


- ब्रिटिशांनी सिराजला नवाब पदावरून काढण्यासाठी मोहीम सुरू केली.
- सिराजचा सेनापती मीर जाफर याला ब्रिटिशांनी नवाब पदाचे आमिष दाखवले.
- इंग्रजांच्या कारवायांची कल्पना आल्याने सिराज मोठ्या सैन्यानिशी इंग्रजांवर चालून गेला.
- 23 जून, 1757 रोजी प्लासी येथे लढाईला सुरवात झाली.

- इंग्रजांच्या सैन्यात 950 युरोपीयन व 2100 भारतीय सैनिक होते, तर सिराजच्या सैन्यात 50,000 सैनिक होते. मात्र, मीर जफरच्या नेतृत्वाखालील नवाबाचे लष्कर लढाईत उतरलेच नाही. मीर जाफरच्या तटस्थ राहण्यामुळे सिराजचा सहज पराभव झाला.
- इंग्रजांचा सेनापती रॉबर्ट क्लाइव्ह होता. नवाबाचा सेनापती मीर जाफर हा आधीच ब्रिटिशांना सामील होता. या लढाईत सिराज उद्दौल्ला मारला गेला.

# प्लासीच्या लढाईचे परिणाम:

- मीर जाफरला बंगालचा नवाब बनविण्यात आले.
- रॉबर्ट क्लाईव्हला बंगालचा गव्हर्नर म्हणून नेमण्यात आले. (1757-60)
- मीर जाफरने कंपनीच्या अधिकाऱ्यांना 50 लाख रुपये,क्लाईव्हला मोठ्या रकमेची वैयक्तिक देणगी, तसेच कंपनीला नुकसानभरपाई दिली .

- बंगालमधील सर्व फ्रेंच वसाहती कंपनीला देण्यात आल्या.
- कंपनीला बंगाल, बिहार व ओरिसामध्ये निर्विरोध मुक्त व्यापाराचा अधिकार देण्यात आला.
- इंग्रज अधिकाऱ्यांना त्यांच्या खाजगी व्यापारावर कोणतेही कर देण्याची आवश्यकता नसेल.



# मीर जाफर (1757 - 1760)

- प्लासीनंतर इंग्रजांच्या पाठिंब्याने मीर जाफर बंगालचा नवाब बनला.
- क्लाइव्ह व इतर अधिकाऱ्यांना लाखो रुपये भेट दिले. बंगालमधील सर्व फ्रेंच वसाहती इंग्रजांना दिल्या.
- तसेच तो आपला राज्यकारभार मुर्शिदाबादवरून पाहू लागला.

- इंग्रजांच्या मागण्या मीर जाफरच्या आवाक्याबाहेर जाऊ लागल्या. कंपनीने केलेली पैशांची मागणी तो पूर्ण करू शकला नाही. म्हणून मीर जाफरला नवाब पदावरून दूर करण्याचे क्लाइव्हने ठरविले.
- यावेळी मीर जाफरने इंग्रजांविरुद्ध डचांची मदत घेण्याचा प्रयत्न केला. मात्र ब्रिटिशांनी 1759 साली डचांचा बेडेराच्या लढाईत पराभव केला.



# मीर कासिम (1760-1763)

- मीर कासिम हा मीर जाफरचा जावई होता.
- 1760 साली ब्रिटिशांनी त्याला नवाब बनविले.

- इंग्रज व मीर कासिम यांच्या दरम्यान सप्टेंबर 1760 मध्ये एक तह झाला. त्यानुसार असे ठरले की, कंपनीला बरद्वान, मिदनापूर व चितगाव हे जिल्हे द्यावेत.
- दक्षिण मोहिमेसाठी 5 लाख रुपये द्यावेत.
- दोघांचेही मित्र व शत्रू सारखेच राहतील.
- यावेळी मीर कासिमने अधिकाऱ्यांना मोठमोठी बक्षिसे दिली.

- सत्तेवर येताच काही महिन्यांतच त्याने इंग्रजांचे देणे पूर्ण केले. इंग्रजांचे सान्निध्य टाळण्यासाठी त्याने आपली राजधानी मुर्शिदाबादहून मुंगेरला नेली.
- मुंगेरला आधुनिक तोफा व बंदुका तयार करण्याचा कारखाना काढला.

# मीर जाफर (1763-1765)

पुन्हा एकदा मीर जाफरला नवाब बनविल्यानंतर इंग्रजांनी त्याच्याकडून युद्धखर्च, भेटवस्तू या स्वरूपात भरपूर द्रव्य उकळले.

मीर कासिमने रद्द केलेली भारतीयांवरील जकात पुन्हा सुरू केली.

इंग्रजांविरुद्ध बंगालमध्ये कोणालाही तटबंदी बांधण्यास मनाई केली.



# बक्सारची लढाई (22 ऑक्टोबर 1764)

- नवाबपद गेल्यानंतर मीर कासिम हा अवधच्या नवाबाच्या आश्रयाला गेला होता.
- अवधचा नवाब शुजाउद्दौल्ला, मुघल बादशाह शाहआलम व मीर कासिम हे तिघे इंग्रजांविरुद्ध एकत्र आले.
- 22 ऑक्टोबर 1764 रोजी बक्सार येथे युद्ध झाले. यावेळी इंग्रजांचे नेतृत्व मेजर हेक्टर मुन्रो याने केले.त्याने तिघांच्या सैन्यांचा पराभव केला.

# PYQ

**संयुक्त गट ब व क मुख्य**

1)1757 च्या प्लासीच्या युद्धात हा इंग्रजी सैन्याच सेनापती होता.(Clerk 2019)

(1) एलफिन्स्टन (2) वॉरन हेस्टींग्ज

(3) रॉबर्ट क्लाइव्ह (4) डलहौसी

2)a. पहिले वाक्यः प्लासीच्या लढाईनंतर, मीरजाफर हा बंगालचा नवाब बनला.

b. दूसरे वाक्य : मीरजाफर आपला राज्य कारभार राजधानी मुर्शिदाबाद वरून पाहु लागला.

वरीलपैकी कोणते विधान / विधाने बरोबर आहे/त ? (राज्यसेवा 2023)

(1) b फक्त (2) a फक्त

(3) यापैकी नाही (4) a, b

**3)1757 नंतर बंगालचा नवीन नवाब म्हणून ब्रिटीशांनी कोणाची नियुक्ती केली ?(राज्यसेवा 2022)**

(1) मिर जाफर (2) मिर कासीम

(3) सिराज-उद्-दौला (4) शहा अलम

**4) कोणत्या मोगल राजाच्या परवानगीने सुरत येथे ब्रिटीशांनी आपली पहिली फॅक्टरी स्थापन केली ?(2021)**

(1) अकबर (2) जहाँगीर

(3) हुमायून (4) शहाजहान

# प्रारंभीच्या काळातील गव्हर्नर व गव्हर्नर जनरल





# रॉबर्ट क्लाईव्ह (1757-1760, दुसऱ्यांदा 1765-1767)

- रॉबर्ट क्लाईव्ह भारतात ईस्ट इंडिया कंपनीच्या सेवेत 1744 मध्ये सुरवातीला 'रायटर' म्हणून आला होता.
- मात्र नंतर तो लष्करात कॅप्टन म्हणून भरती झाला.
- दुसऱ्या इंग्रज-फ्रेंच युद्धादरम्यान (1748-54) मद्रासच्या ब्रिटिश लष्कराचा जनरल या नात्याने त्याने घडवून आणलेल्या 'अर्काटच्या वेढ्या'मुळे (1751) ब्रिटिशांचा विजय झाला.या  क्लाईव्ह प्रकाशझोतात आला.

- 1757 ते 1760 व 1765 ते 1767 या काळात क्लाईव्ह दोनवेळा बंगालचा गव्हर्नर बनला.
- 1765 मध्ये क्लाईव्हने बंगाल प्रांतात दुहेरी राज्यव्यवस्था सुरू केली.

- ऑगस्ट 1765 मध्ये क्लाईव्हने अलाहाबाद तहान्वये बादशहा शहाआलमकडून बंगाल, बिहार, ओरिसा प्रांतांच्या दिवाणीचे अधिकार मिळविले.
- हे अधिकार प्रत्यक्ष कंपनीच्या वतीने वापरण्याऐवजी नबाबाच्या वतीने वापरण्याचा निर्णय घेतला.
- नबाबाला जबाबदार असे दोन नायब दिवाण नेमून क्लाईव्हने त्यांच्यावर कंपनीसाठी सारा वसूल करण्याची जबाबदारी सोपविली.

- 'दुहेरी राज्यव्यवस्थेनुसार' वसुलीचे सर्व अधिकार कंपनीकडे आले, परंतु त्याची जबाबदारी मात्र नबाबाकडे राहिली थोडक्यात, कोणत्याही परिश्रमांशिवाय कंपनीला दिवाणी व फौजदारी असे दोन्ही अधिकार प्राप्त झाले.
- दुहेरी राज्यव्यवस्थेवर टीका झाली व यावर नियंत्रण ठेवण्यासाठी 1773 मध्ये रेग्युलेटिंग ॲक्ट संमत करण्यात आला.
- क्लाईव्हने बंगालच्या लष्करी अधिकाऱ्यांना दिला जाणारा दुप्पट भत्ता रद्द केला

# व्हेरलस्ट (1767 ते 1769) ; कार्टियर (1769 ते 1772):

या गव्हर्नर्सच्या काळातही दुहेरी राज्यव्यवस्थेच्या नावाखाली भ्रष्टाचार सुरूच होता.

यांच्या काळात पहिले म्हैसूर युद्ध झाले.(1766-1769)

# वॉरेन हेस्टिंग्ज (1772 ते 1785)



- 1772 : हेस्टिंग्ज याने लॉर्ड क्लाईव्हची दुहेरी राज्यव्यवस्था बंद केली
- रेग्युलेटिंग ॲक्ट (1773): या कायद्यानुसार बंगालचा गव्हर्नर हा गव्हर्नर जनरल बनला व त्याला मुंबई व मद्रास प्रांतांच्या गव्हर्नरांवर नियंत्रण ठवण्याचे अधिकार प्राप्त झाले.
- यानुसार 1773 साली वॉरन हेस्टिंग्ज हा बंगाल प्रांताचा पहिला गव्हर्नर जनरल बनला.

- 1773 : रेग्युलेटिंग ॲक्टनुसार कलकत्यात सर्वोच्च न्यायालयाची स्थापना
- वॉरन हेस्टिंग्जच्या काळात पहिले इंग्रज मराठा युध्द (1775-82)
- साल्हबाईचा तह (1782): या तहानुसार मराठ्यांना ठाणे व साष्ठी ही ठिकाणे मिळाली.

**1780**

दुसरे म्हैसूर युद्ध : इंग्रज-हैदर (1780) व इंग्रज-टिपु सुलतान (1782).

**1784**

मंगलोर तहाने हे युद्ध थांबले.

# 1784 : पिट्स इंडिया ॲक्ट

- ब्रिटिश संसदेच्या या कायद्यानुसार कंपनीवर देखरेख ठेवणाऱ्या 'बोर्ड ऑफ कंट्रोल' या कायमस्वरुपी नियामक मंडळाची निर्मिती झाली.
- कोलकात्याच्या गव्हर्नर जनरलला निर्णायक अधिकार प्राप्त होऊन मुंबई व मद्रासचे गव्हर्नर्स त्याच्या पूर्ण वर्चस्वाखाली आले.

- या कायद्यानुसार 'बोर्ड ऑफ स्ट कंट्रोल'ला इइंडिया कंपनीस भारतातील राज्यकारभाराविषयी आदेश देण्याचा अधिकार देण्यात आला.
- पिट्स इंडिया ॲक्टमुळे ब्रिटिश पार्लमेंटला भारतातील कंपनी प्रशासनावर अप्रत्यक्ष नियंत्रण राखण्यात यश मिळाले.

कर गोळा करण्यासाठी 'कलेक्टर' या इंग्रज अधिकाऱ्याची, तर वसुलीसाठी 'अमील' या भारतीय कर्मचाऱ्याची नियुक्ती केली

**'कोड ऑफ जेण्टू लॉ'** नावाचे कायदेविषयक पुस्तक - हिंदू व मुस्लीम कायद्यांचे संकलन.

- हे पुस्तक हेस्टिंग्जच्या प्रशासनाचे एक महत्त्वपूर्ण पाऊल होते, ज्याचा उद्देश भारतीय कायद्यांना पाश्चात्य कायदेशीर चौकटीत आणणे हा होता.
- या पुस्तकात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांसारख्या हिंदू समाजाच्या विभागांशी संबंधित नियम आणि प्रथांचा समावेश होता.
- हे पुस्तक आधुनिक काळातील हिंदू कायद्याचे मूळ मानले जाते.

- 'कोड ऑफ जेंटू लॉ'( 1776) हे पुस्तक प्रामुख्याने **नॅथॅनियल ब्रॅसी हॅल्हेड** यांनी इंग्रजीत अनुवादित केले आहे.
- वॉरन हेस्टिंग्जच्या पुढाकाराने, ब्राह्मण पंडितांनी संस्कृतमधील 'विवादार्णवसेतू' या कायद्याच्या ग्रंथाचे पर्शियनमध्ये भाषांतर केले होते, ज्याचे नंतर हॅल्हेडने इंग्रजीत रूपांतर केले.
- **मूळ ग्रंथ:** संस्कृतमधील 'विवादार्णवसेतू'
- **उद्देश:** ईस्ट इंडिया कंपनीला भारतातील हिंदू कायदे समजून घेण्यासाठी

1781 - कलकत्ता मदरसाची स्थापना. अरेबिक व पर्शियन भाषांच्या शिक्षणासाठी स्थापना केली.

हेस्टिंग्जला अरबी व फारसी भाषांविषयी माहिती होती व तो बंगाली बोलायचा. त्याने चार्ल्स विल्किन्सनच्या प्रथम गीता अनुवादाला प्रस्तावना लिहिली.

- हेस्टिंग्जने संन्याशांच्या बंडावर नियंत्रण लादले. ज्याचा उल्लेख बंकिम चंद्रांच्या 'आनंदमठ' या कादंबरीत आहे.
- विवाह कर बंद केले. गुलामगिरीची प्रथा समाप्त केली.
- वॉरेन हेस्टिंग्जने औंधच्या नबाबाला रोहिल्यांच्या विरोधात लष्करी मदत केली होती.

- करवसुलीसाठी कर समिती/रेव्हेन्यू बोर्डची स्थापना केली.
- रोहिला युद्ध (1774) या युद्धात वॉरेन हेस्टिंग्जने अवधच्या (औध) नवाबाला रोहिल्याविरुद्ध ब्रिटिश सैन्य पाठवून मदत केली
- कंपनीला मीठ बनवण्याचा अधिकार मिळाला